# अमरावती जिल्ह्यातील स्त्री विलगता निर्देशंकाचे कालनिहाय अभिक्षेत्रीय अध्ययन.

**कु. रूपाली बळवंत देशमुख,** (संशोधक विद्यार्थिनी) प्रा. राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगांव खंडेश्वर, ता. नांदगांव खंडेश्वर, जि. अमरावती (महाराष्ट्र). संशोधन केंद्र क्रं. – 138 मो. नं. 9075431014

---

**सारांश :-** स्त्री हा घटक एक समाजशील प्राणी आहे त्यातूनच सामाजिक चल, माल गुणवत्ता पैलूचा अभ्यास केलेला आहे तसेच यांचा अभ्यास प्रदेशावार अभ्यासातून केला गेला पाहिजे या सर्व गोष्टीचे आकलन करताना स्त्रीला समाजातील महत्त्वपूर्ण अंग मानले गेले स्त्रीला समाजात एक महत्त्वपूर्ण स्थान आहे व तिच्या स्थानावर संपूर्ण आयुष्य निर्भर मानले गेलेले दिसून येते ह्या सर्वातून तिने जाती पंथ धर्माचा विचार न करता स्वतंत्रपणे आपले विचार करायला हवा असे प्रतिपादन करण्यात आले आहे.

भारतीय राज्यघटनेच्या पंधराव्या कलमांमध्ये सांगितले की स्त्री व पुरुष कोणताही भेद राहणार नाही परंतु प्रत्यक्षात मात्र आजही सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान दिले गेले व स्त्रीला संपूर्ण आयुष्यामध्ये ठीक ठिकाणी लक्ष्मण रेषा आखलेल्या आढळून येतात (मंगल खिवसरा स्त्री मुक्ती चळवळ).

जात पात वर्ण यांचे अधिष्ठान असलेला आपल्या समाजव्यवस्थेत सर्व स्तरातील स्त्री अद्यापही गुलामगिरीचे जीवन जगत आहे तर वर्तमान काळात स्त्रीच्या आशेचा अपेक्षेचा असमाधानाचा सुरक्षतेचा गुलामगिरीचे जिणेजगत आहे तर वर्तमान काळात तिच्या आशेचा अपेक्षेचा असमाधानाचा सुरक्षतेचा भंग झाला आहे अशा परिस्थितीतून स्त्रीया आपल्या हक्कासाठी रस्त्यावर येणे जरुरीचे आहे तसेच स्त्रीने आपल्या समाज व्यवस्थेतचे अभिसरण करून आपल्या जगात प्रदेशात शहरात कुटुंबात आपल्याबद्दल कल्पना बदलण्यास ती एक प्रर्वतक ठरली गेली पाहिजे.

**Keywords :-** स्त्रीया, विलगता निर्देशांक, व्यवसाय, गुंतलेला.

**प्रस्तावना :-** भारतीय समाजात स्त्री, पुरुष, धर्म, जाती, पंथ, सामाजिक स्तर, आर्थिक स्तर, सांस्कृतिक स्तर यात विभागला गेला आहे हे आढळून येते त्यानुसार तो भारतीय समाजाला लागलेला तो एक अभिशाप आहे या अभिशापामुळे त्या भागाचे मापन करणे हा त्यामागील उद्देश आहे. प्रत्येक पैलूचा प्रदेशावर, जिल्ह्यावर, राज्यावर अभ्यास करून मानव किती हुशार आहे हे लक्षात येते त्यातूनच मानव हा पृथ्वीवर अत्यंत हुशार प्राणी समजला जातो. मानव हा ध्येय साध्य करत असतो मानवीय विकासाचे ध्येय लोकांचे कल्याण आहे. त्यातून तो आपले दुसऱ्या व्यक्तीचे कल्याण करण्यासाठीच प्रयत्नशील असतो तर पैशाअभावी सार्वजनिक कल्याण अशक्य असते. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास हे मानवी कल्याणाचे मुख्य पैलू आहे या पैलू मध्ये सर्व गोष्टी लक्षात घेऊन विकास म्हणजे केवळ उत्पन्न आणि संपत्तीचा विस्तार नसून मानवीय कार्यक्षमता आणि क्षमता वाढविण्याची एक प्रक्रिया आहे मानवी विकास म्हणजे लोकांच्या निवडी आणि त्यांनी मिळवलेल्या कल्याणाची पातळी वाढविण्याची प्रक्रिया होय (UNDPHOL, अहवाल १९९०).

मानवी विकास अहवालानुसार विकासाच्या पातळी व्यतिरिक्त लोकांची तीन आकांक्षा किंवा निवडी महत्त्वाच्या आहे पहिले म्हणजे दीर्घ आणि निरोगी आयुष्य जगणे दुसरे म्हणजे साक्षर किंवा ध्यानी असणे आणि तिसरे चांगले राहणीमानासाठी आवश्यक असलेली संसाधनाची उपलब्धता किंवा प्राप्ती हे तिन्ही वेगवेगळे निदर्शनाद्वारे दर्शविल्या जाऊ शकतात माननीय निवडीमध्ये निश्चित दीर्घ विरोधी आयुष्य जगणे मान ज्ञानसंपदा, राजकीय स्वातंत्र्य, सामाजिक सुरक्षा यांचा समावेश आहे

शैक्षणिक उपलब्धता ज्याला प्रौढ साक्षरता म्हणतात दोन तृतीयांश प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीया स्तरावरील शिक्षण (GER) दाखवू शकतो राहणीमान जे दरदोई सखल देशांतर्गत उत्पादन GDP स्वरूपात उत्पन्न मोजले जाते 1990 पासून दरवर्षी मानवी विकास निर्देशांक तयार केले जात आहे तो एक सध्या संमीश्र निदर्शनाच्या

स्वरूपात मूलभूत मानवीय विकासाच्या सरासरी कामगिरीचे मोजमाप करतो आणि वेगवेगळया पद्धती ने पदानुक्रम निश्चित करतो (लोकसंख्या भूगोल प्रा. सावंत प्रा .आठवले प्रा.मुसा मांडे)

**अभ्यासाची उद्देश:-**

1. तालुका निहाय लोकसंख्येचे केंद्रीकरणात स्त्री लोकसंख्येचा अभ्यास करणे.
2. तालुका निहाय लोकसंख्येतील घनतेच्या वाढीचा अभ्यास करणे.
3. अमरावती जिल्ह्यातील विलगता ही कोणत्या भागात सर्वात जास्त आहे याचा अभ्यास करणे
4. अमरावती जिल्ह्यात विलगता कोणत्या भागात सर्वात कमी आहे यांचा अभ्यास करणे
5. विविध व्यवसायात गुंतलेल्या स्त्रीच्या प्रमाणाानुसार विलगतेचा अभ्यास करणे
6. प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या स्त्रियांच्या प्रमाणात नुसार विलगतेचा अभ्यास करणे

**विषय विवेचन :-** मानवी भूगोल ही भूगोलांच्या तुलनेने अगदी नवीन शाखा आहे या शाखेत मानवी लोकसंख्येचा अभ्यास केला जातो त्याचप्रमाणे मानवीय लोकसंख्येचा आकार रचना वैशिष्ठ त्यामधून झालेला बदल स्थलांतर सामाजिक गती क्षमता या पाच प्रक्रियेद्वारे अभ्यास केला जाऊ शकतो (लोकसंख्या भूगोल प्रा. सावंत, प्रा. आठवले, प्रा, मूसमांडे) यामधूनच अमरावती जिल्ह्यातील तालुका निहाय लोकसंख्येचा अभ्यास करून लोकसंख्येनुसार शेतमजूर, शेतकरी स्त्रीया यांच्या प्रमाणाची टक्केवारी काढणे ग्रामीण स्त्रीया व नागरी स्त्रियांचे प्रमाण तपासणे सर्वात अधिक नागरीय लोकसंख्या कोणत्या तालुक्यात केंद्र झाले आहे यावर दृष्टीक्षेप टाकुण या सर्व गोष्टींचा मानवीय निर्देशांक काढून त्याद्वारे विलगता दाखविणे याकरिता विलगता निर्देशांकाचे सूत्र:-

**Formula :-**


$$= \mathrm{ISXY} = \frac{\mathrm{IDXY}}{1 - \mathrm{Syi/xi}}$$

या सूत्राचा वापर करून अमरावती जिल्ह्यातील क्षेत्रीय स्वरूप स्पष्ट करून स्त्री लोकसंख्या विषमतेचा निर्देशांक काढून दोन चलातील सहचार्य दाखविण्यात आलेला आहे स्त्री लोकसंख्या समंक घेऊन समीकरणाद्वारे विलगतेचा निर्देशांक काढणे.

**प्राथमिक व्यवसायात गुंतलेली स्त्री लोकसंख्या व एकुण स्त्री लोकसंख्येची विलगता 2001**

| अ. क्रं. | तहसील | प्राथमिक व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या Y | एकूण स्त्री लोकसंख्या X | विलगतेचा निर्देशांक Ixsy |
|---|---|---|---|---|
| 1 | वरुड | ३७९६५ | ३२७१२५ | |
| 2 | अचलपूर | ३२७६३ | १२१८२७ | |
| 3 | धारणी | ३१५६३ | १०२१७३ | १४.९२ |
| | | १०२२९१ | ५५११२५ | |
| 4 | चांदूरबाजार | २८८६३ | ९१७३१ | |
| 5 | अमरावती | २५७१९ | ८२७४७ | |
| 6 | दर्यापूर | ८२१८० | ७८५९७ | १.६४ |
| | | १३६७६२ | २५३०७५ | |
| 7 | मोर्शी | २७११९ | ७२५२९ | |
| 8 | नांदगाव खंडेश्वर | २३१८१ | ७२११९ | |
| 9 | अंजनगाव | २२१०७ | ६१५०६ | ८.४५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सुर्जी | | | |
| | | ७२४०७ | २०६१५४ | |
| 10 | चिखलदरा | २१५५६ | ६०४५८ | |
| 11 | भातकूली | १८९९९ | ५२८५० | |
| 12 | धामणगाव रेल्वे | १८९४८ | ४७४५८ | |
| 13 | तिवसा | १५७७१ | ४६६१३ | ३.२० |
| 14 | चांदूररेल्वे | १४४०९ | ४३८२० | |
| | | ८९९८३ | २५११९९ | |




प्रस्तुत निबंधात अमरावती जिल्ह्यातील तालुका निहाय लोकसंख्येचा अभ्यास केला असता प्राथमिक व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या यामधील विलगतेचे परिणाम निश्चित करण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील लोकसंख्या ही सर्वात जास्त वरूड तालुक्यात आढळून येते तर सर्वात कमी कार्यक्षम लोकसंख्या ही चांदुर बाजार तालुक्यात आढळून येते

अमरावती जिल्ह्यातील अभ्यास केला असता उतरत्या श्रेणीनुसार त्याचे गट पाडल्यास सर्वात जास्त लोकसंख्या वरूड, अचलपूर, धारणी 14.92% आढळून येते द्वितीय श्रेणी नुसार मोर्शी, नांदगांव खंडेश्वर आणि अंजनगाव सुर्जी 8.45% आढळुन येते. तृतीय श्रेणीनुसार चिखलदरा, भातकुली, धामनगांव रेल्वे, तिवसा, चांदुर रेल्वे 3.20% या तालुक्यात आढळून येते तर चतुर्थ श्रेणीनुसार चांदूर बाजार, अमरावती, दर्यापूर 1.64% आढळुन येते.

यावरून असे निदर्शनास येते की सर्वात जास्त प्राथमिक कामात गुंतलेली स्त्री लोकसंख्येचे प्रमाण हे वरूड अचलपूर, धारणी तालुक्यात आढळून येते तर सर्वात कमी चांदूर बाजार, अमरावती, दर्यापूर या तालुक्यात आढळून येते.

**निष्कर्ष :-** प्रस्तुत निबंधामध्ये अमरावती जिल्ह्यातील व्यवसायानुसार स्त्री विलगतेचा निर्देशंकाचा अभ्यास केला असता पुढील निष्कर्ष आढळते

1. 2001 दशकात एकूण लोकसंख्या ही सर्वात जास्त वरूड तालुक्यात दिसुन येते.
2. सर्वात कमी कार्यक्षम लोकसंख्या चांदूर बाजार तालुक्यात आढळून येते.
3. स्त्री लोकसंख्येचा विचार केल्यास स्त्रीया ह्या सर्वात जास्त प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या दिसून येतात.
4. गावाचा विचार केल्यास गावामध्ये सर्वात जास्त शेतीमध्ये काम करणाऱ्या स्त्रीया आढळून येतात.
5. शहराचा विचार केल्यास शहरांमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण हे कमी जास्त प्रमाणात आढळून येतात.
6. शहरांमध्ये स्त्रीया काही प्राथमिक द्वितीय तृतीय या व्यवसायामध्ये वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रमाणे विभागली गेलेली दिसून येते.
7. द्वितीय व्यवसायात गुंतलेल्या स्त्रीयांच्या प्रमाणानुसार विलगतेचा अभ्यास करणे.
8. तृतीय व्यवसायात गुंतलेल्या स्त्रीयांच्या प्रमाणानुसार विलगतेचा अभ्यास करणे.
9. तालुका निहाय लोकसंख्येतील विचलनानुसार अभ्यास करणे.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**

1. डॉ. अहिराव व्ही. आर. अली झाड एस एस 1997. :- अधिवास भूविज्ञान
2. डॉ. बंसल .एस. बी.:-अधिवास देव जनसंख्या भूगोल रस्तोगी प्रकाशन मेरठ.
3. प्रा.डॉ .घोलप.:-लोकसंख्या भूगोल निशिकांत प्रकाशन, पुणे.
4. Mandal R. B, (1982) urbanlzation and regional development concept publication company, New Delhi.
5. डॉ. माजिद हुसेन 2002:-मानवी भूगोल
6. Ahmed. E.(1990), :-distribution of population U P
7. Dr. Clark. C. (1967):-population growth and land use Machlilan and co London
8. Fellmann. J. D (1957) urban geography concept at elementary and secondary clevels. Vol. IV. PP. 275